# संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप.

## ता.द.सोलापूर, जि.सोलापूर

# राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## २०२०-२०२१

# नियमित कार्यक्रम अहवाल

**वृक्षारोपण-** २०२०-२०२१ यावर्षी महाविद्यालयात स्वच्छता अॅक्शन प्लॅनची स्थापना करण्यात आली. या प्लॅनमधील ग्रीनरी या घटकाअंतर्गत गुरुवार दि.३०/०७/२०२० रोजी महाविद्यालयात रा.से.यो.विभागाच्यावतीने प्राचार्य,प्राध्यापक व कर्मचारी यांच्याहस्ते स्वच्छता अॅक्शन प्लॅन अंतर्गत महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण केले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे,आय.क्यू.ए.सी.चे समन्वयक डॉ.सी.एस.मुलगे,रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.जवाहर मोरे,ग्रंथपाल प्रा.व्ही.एस.गडगी व सर्व कर्मचारी उपस्थित होते.

**फिट इंडिया कार्यक्रम -** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या मार्गदर्शक परिपत्रकानुसार गुरुवार दि.०३/०९/२०२० रोजी रा.से.यो. विभागाअंतर्गत फिट इंडिया कार्यक्रम ऑनलाईन पध्दतीने राबवण्यात आला. प्राचार्य,प्राध्यापक,कर्मचारी,स्वयंसेवक यांनी प्रत्यक्ष चालणे, योगासने करणे,सायकलिंग करणे,धावणे इ.उपक्रम राबवून फिट इंडिया कार्यक्रम पार पडला.या उपक्रमात सर्वांनीच उत्साहाने सहभाग नोंदवला. या उपक्रमाची व्हिडीओ क्लीप करुन यु टयुब मार्फत प्रसारित करण्यात आली.यासाठी प्राचार्य,प्राध्यापक,कर्मचारी,स्वयंसेवक यांचे सहकार्य लाभले.

**कोरोना जनजागृती शपथ -** शुक्रवार दि.३०/१०/२०२० रोजी कोरोना या महामारी संसर्गजन्य रोगाविषयी जनजागृती करण्यासाठी स्वयंसेवकांना शपथ घेण्यास सांगितले. प्रत्येकानी आपापल्या घरी संबंधिताना शपथ देवून कोरोना जनजागृती करण्यात आली. महाविद्यालयातही प्राचार्य,प्राध्यापक,कर्मचारी यांनीही सदर शपथ घेतली. या शपथ मोहिमेमध्ये पहिल्यांदा महाविद्यालयातील प्राचार्य व उपस्थित प्राध्यापक यांनी शपथ घेतली.त्याचबरोबर कर्मचारी यांचेकडून बी.बी.बनसोडे यांनी शपथ वदवून घेतली. याही कार्यक्रमाची व्हिडीओ क्लीप करुन यु टयुब मार्फत प्रसारित करण्यात आली.

**ई-मॅरेथॉन -** कोरोना काळातील संचारबंदीमुळे शारीरिक तंदुरुस्तीसाठी रा.से.यो. विभागाच्या वतीने दि.१५/११/२०२० ते २०/११/२०२० दरम्यान रा.से.यो. चे सर्व स्वयंसेवक यांनी आपल्या घरासमोरील रस्त्यावर धावणे व चालणे या पध्दतीने ई-मॅरेथॉन उपक्रम ऑनलाईन पध्दतीने घेण्यात आला. या

उपक्रमातही मोठया संख्येने सहभाग नोंदविण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांचे प्रोत्साहन मिळाले.कर्मचारी यांचेही सहकार्य लाभले. याही कार्यक्रमाची व्हिडीओ क्लीप करुन यु टयुब मार्फत प्रसारित करण्यात आली.

**कौमी एकता सप्ताह-** बुधवार दि.२५/११/२०२० रोजी महाविद्यालयातील रा.से.यो.विभागाच्यावतीने कौमी एकता सप्ताहाचे औचित्य साधून ध्वजनिधी संकलन करण्यात आला.महाविद्यालयातील स्वयंसेवक यांनी स्वेच्छेने व दानशूर व्यक्तीकडून ध्वजनिधी संकलन केला. महाविद्यालयाचे प्राचार्य,प्राध्यापक,कर्मचारी यांनीही ध्वजनिधी देवून सहकार्य केले. एकूण रक्कम ५८२१/- रुपये झाली. ही रक्कम स्टेट बॅक ऑफ इंडिया,शाखा दिल्ली येथे पाठवण्यात आली. याही कार्यक्रमाची व्हिडीओ क्लीप करुन यु टयुब मार्फत प्रसारित करण्यात आली.

**महाविद्यालय परीसर स्वच्छता-** रासेयो विभागाच्या नियमित कार्यक्रमाचा एक भाग म्हणून मंगळवार दि.२९/१२/२०२० रोजी महाविद्यालयातील रा.से.योच्या स्वयंसेवकामार्फत एक दिवस प्रत्यक्ष बोलावून परीसर स्वच्छता करण्यात आली. यामध्ये महाविद्यालय परीसर स्वच्छता करणे, झाडांना आळी करणे, वाळलेले गवत काढणे इत्यादी कामे करण्यात आली. सकाळी ९.०० ते १२.०० यावेळेत संपूर्ण परिसर स्वच्छ करण्यात आला. यामध्ये १३५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. सहभागी स्वयंसेवकांची हजेरी घेऊन त्यांना अल्पोपहार देण्यात आला.

**नक्ष उपक्रमात सहभाग-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूरच्या मार्गदर्शक परिपत्रकानुसार दि.१० ते १६/०१/२०२१ दरम्यान नक्ष उपक्रमाअंतर्गत ए.पी.जे.अब्दुल कलाम टेक्नॉलाजी युनिर्व्हसिटी रासेयो आयोजित ओपन स्ट्रीट मॅप प्रशिक्षण कार्यक्रमात सायं.७.०० ते९.०० दरम्यान कार्यक्रम अधिकारी प्रा.जवाहर मोरे व स्वयंसेवकांनी सहभाग नोंदवला. हा उपक्रम लिंक व युटयुबव्दारे प्रसारित झाला होता. प्रशिक्षणादरम्यान मिळालेल्या माहितीचा उपयोग गावासाठी करावा असे आवाहन प्रा.जवाहर मोरे यांनी केले.

**माझी वसुंधरा अभियान-** बुधवार दि.२०/०१/२०२१ रोजी महाविद्यालयातील रासेयो विभागाच्या वतीने माझी वसुंधरा अभियान हा उपक्रम ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात आला. यावेळी स्वयंसेवकानी वृक्षारोपण,परीसर स्वच्छता,पाणी टाकी स्वच्छता करण्यात आली. तसेच या अभियानाअंतर्गत ऑनलाईन शपथ वदवून घेण्यात आली. हे अभियान यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांचे प्रोत्साहन मिळाले तर स्वयंसेवकांना कार्यक्रम अधिकारी प्रा.जवाहर मोरे यांनी मार्गदर्शन केले. याही कार्यक्रमाची व्हिडीओ क्लीप करुन यु टयुब मार्फत प्रसारित करण्यात आली.

**पराक्रम दिवस साजरा-** शनिवार दि.२३/०१/२०२१ रोजी महाविद्यालयातील रासेयो विभागाच्या वतीने नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.जवाहर मोरे यांनी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील कार्याची माहिती दिली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

**राष्ट्रीय मतदार दिन-** सोमवार दि.२५/०१/२०२१ रोजी महाविद्यालय व रा.से.यो.च्या वतीने राष्ट्रीय मतदार दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित प्राध्यापक,कर्मचारी व विद्यार्थी यांना लोकशाही,प्रामाणिक व निकोपपणे मतदान करण्याची शपथ देण्यात आली.

**प्रजासत्ताक दिन-** मंगळवार दि.२६/०१/२०२१ रोजी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या दिवशी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर त्यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले. यावेळी शारीरिक शिक्षण संचालक डॉ.एस.एस.तोरवी ,रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.जवाहर मोरे,डॉ.बी.एन.आदटराव, रासेयो समिती सदस्य ,सर्व प्राध्यापक,कर्मचारी व स्वयंसेवक उपस्थित होते. यावेळी रासेयोच्या वतीने खाऊ वाटप करण्यात आला.

**पोलिओ लसीकरण मोहिम-** रविवार दि.३१/०१/२०२१ या दिवशी महाविद्यालयातील रासेयो विभागाच्या वतीने पोलिओ लसीकरण मोहिम यशस्वीरित्या राबवण्यात आली. या मोहिमेत स्वयंसेवकांनी आपापल्या गावातील पोलिओ लसीकरण केंद्रावर जावून रजिस्टर नोंद करणे, मुलांचे वजन करणे, पोलिओ डोस देणे यासारखी मदत केली. ही मोहिम यशस्वी करण्यासाठी रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.जवाहर मोरे यांनी स्वयंसेवकासह पोलिओ लसीकरण केंद्राला भेट दिली. याही कार्यक्रमाची व्हिडीओ क्लीप करुन यु टयुब मार्फत प्रसारित करण्यात आली.

**कोविड लसीकरण मोहिम-** दि.०३ ते ०९/०२/२०२१ दरम्यान महाविद्यालयातील रासेयो विभागाच्या वतीने कोविड लसीकरण जनजागृती मोहिम यशस्वीरित्या राबवण्यात आली. यावेळी स्वयंसेवकांनी आपापल्या गावातील लोकांना एकत्र करुन लसीकरण जनजागृती करण्यात आली. लस घेणे, लसीबाबत अफवा पसरवू नये वगैरे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर लस घेतली तरी कोरोनाचे नियम पाळणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले.कुटुंबाच्या जबाबदारीचे महत्वही पटवून दिले. ही मोहिम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांचे प्रोत्साहन मिळाले तर स्वयंसेवकांना कार्यक्रम अधिकारी प्रा.जवाहर मोरे यांनी मार्गदर्शन केले. याही कार्यक्रमाची व्हिडीओ क्लीप करुन यु टयुब मार्फत प्रसारित करण्यात आली.

**रासेयो सल्लागार समितीची बैठक-** गुरुवारी दि.१८/०२/२०२१ रोजी महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीची बैठक ऑनलाईन पध्दतीने पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे होते तर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर रासेयो

विभागाचे संचालक डॉ.गुणवंत सरवदे व रासेयो जिल्हा समन्वयक डॉ.विरभद्र दंडे यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा.जवाहर मोरे यांनी प्रास्ताविक करुन वर्षभरातील उपक्रमांचा आढावा घेतला. बैठकीतील विषयानुसार सर्वांनी मार्गदर्शन केले. डॉ.बी.एन.आदटराव यांनी आभार मानले. या बैठकीसाठी महाविद्यालयातील रासेयो समिती सदस्य व विद्यार्थी प्रतिनिधी हजर होते.

**महिला दिन उपक्रम -** बुधवार दि.१०/०३/२०२१ रोजी महाविद्यालयातील रा.से.यो.च्यावतीने महिला दिनाचे औचित्य साधून सोलापूर येथील मा.ॲड.देवयानी किणगी यांचे महिलांचे सबलीकरण,स्वसंरक्षण या विषयावर ऑनलाईन पध्दतीने व्याख्यान घेण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे होते तर प्रमुख उपस्थिती मंद्रुप पोलीस स्टेशनचे स.पो.नि. नितीन थेटे यांची होती. यावेळी ॲड.किणगी यांनी सहभागीना अनमोल असे मार्गदर्शन केले.

त्याचबरोबर वर्षभरामध्ये महाराष्ट्र शासन व विद्यापीठाच्या वतीने वेळोवेळी सुचविलेल्या ऑनलाईन कार्यक्रमामध्येही कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवकांनी उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवला.यावर्षी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा.जवाहर मोरे यांना महाराष्ट्र शासनाचा कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार जाहीर करण्यात आला. तसेच त्यांची पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर रासेयो विभागीय समन्वयकपदी निवड झाली. त्याचबरोबर प्रा.जवाहर मोरे व सुनिल भिमाशंकर शिरसीकर(बी.ए.भाग-२) या स्वयंसेवकाची विद्यापीठ रासेयो सल्लागार समितीचे सदस्य म्हणून २०२०-२१ ते २०२१-२२ या दोन वर्षासाठी निवड करण्यात आली.

अशारीतीने वरील सर्व उपक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र शासन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर रासेयो विभाग, सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ या संस्थेचे पदाधिकारी,महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांचे प्रोत्साहनपर मार्गदर्शन लाभले तसेच रासेयो समिती सदस्य, सर्व कर्मचारी, स्वयंसेवक व माजी स्वयंसेवक प्रदीप धुळखेडे यांनी अथक परिश्रम घेतले.

Programme Officer
National Sercive Scheme
Santosh Bhimrao Patil Arts,Comm
& Science College. Mandrup

प्राचार्य,
संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप.

सन 2020-2021

# संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप

**अंतर्गत तक्रार निवारण समिती आयोजित**

**जागतिक महिला दिन उपक्रम अहवाल**

आमच्या महाविद्यालयात बुधवार दि.१०/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने सावित्रीबाई फुले स्मृतीदिन व जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोलापूर येथील विधी सेवा प्राधीकरणच्या रिटेनर लॉयर्स ॲड.देवयानी किणगी यांचे आभासी प्रणालीद्वारे महिलांचे सबलीकरण व स्वसंरक्षण या विषयावर व्याख्यान पार पडले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे होते तर प्रमुख उपस्थिती मंद्रुप पोलीस स्टेशनचे स.पो.नि. नितीन थेटे यांची होती.

प्रारंभी प्रास्ताविक अंतर्गत तक्रार निवारण समिती समन्वयक प्रा.श्रीमती बी.एस.कोरे यांनी केले. अतिथी परिचय प्रा.विजय साळवे यांनी करुन दिला. मार्गदर्शन करताना ॲड.किणगी म्हणाल्या की. मुलींनो स्पष्टपणे बोलायला शिका, मदत मागायला घाबरु नका, तुमच्यामध्ये आत्मविश्वास नसेल तर कायदयाचा उपयोग होत नाही. त्यामुळे खंबीरपणे अन्यायावर मात करायला शिका. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांनी मुलींनी अन्यायाबाबत धीटपणे प्रतिकार केला पाहिजे. वर्तणूक चांगली ठेवली पाहिजे. कुटूंबीयांनी मुलींना विश्वासात घेवून सहकार्य केले पाहिजे असे मत व्यक्त केले. यावेळी स.पो.नि.नितीन थेटे यांनी ही मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विजय साळवे यांनी केले तर आभार रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी प्रा.जवाहर मोरे यांनी मानले. या कार्यक्रमामध्ये एकूण ७६ जणांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रा.से.यो.समिती, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

(शिक्का: संतोष भीमराव पाटील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप)

प्राचार्य,
संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप.

# संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,मंद्रुप

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत तक्रार निवारण समिती आयोजित

## सावित्रीबाई फुले स्मृतीदिन व जागतिक महिला दिनानिमित्त

## व्याख्यान (ऑनलाईन)

बुधवार — दि.१०/०३/२०२१

प्रमुख वक्ते :- मा.ॲड.देवयानी किणगी

(जिल्हा न्यायालय,सोलापूर)

विषय :- महिलांचे सबलीकरण,स्वसंरक्षण

अध्यक्ष :- प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे

## कार्यक्रमपत्रिका

- **प्रास्ताविक** : प्रा.श्रीमती बी.एस.कोरे (समन्वयक)
- **अतिथी परिचय** : प्रा.विजय साळवे
- **मनोगत** : मा.नितीन थेटे (सपोनि,पोलीस स्टेशन,मंद्रुप)
- **मार्गदर्शन** : मा.ॲड.देवयानी किणगी (जिल्हा न्यायालय,सोलापूर)
- **अध्यक्षीय समारोप** : प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे
- **आभार** : प्रा.जवाहर मोरे (रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी)
- **सूत्रसंचालन** : प्रा.विजय साळवे

# संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप

दि.२१/०१/२०२१

## अंतर्गत तक्रार निवारण समिती आयोजित

## वेबिनार - रॅगिंग आणि मानसिक ताण व्यवस्थापन

### अहवाल

संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,मंद्रुप व सी.बी.खेडगीज महाविद्यालय,अक्कलकोट यांच्यात झालेल्या सामंजस्य करारांतर्गत आयोजित **रॅगिंग आणि मानसिक ताण व्यवस्थापन** या विषयावर ऑनलाईन वेबिनारचे आयोजन दि.२१/०१/२०२१ रोजी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते/व्याख्याते म्हणून सोलापूरचे सुप्रसिध्द अस्थिरोगतज्ञ तथा चेअरमन युथ होस्टेल असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर युनिटचे डॉ.व्यंकटेश मेतन हे होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे होते.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत सौ.जे.एस.बिराजदार यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचा परिचय डॉ.एस.सी.आडवीतोट यांनी केले. मार्गदर्शन करताना डॉ.व्यंकटेश मेतन यांनी विद्यार्थ्यांनी तणावांचे व्यवस्थापन उत्तमरित्या केले तरच जीवनातील कोणत्याही आव्हांनांना सक्षमपणे सामोरे जाल व स्वत:चे जीवन आनंदमय होईल. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचे छळ ,त्रास सहन न करता योग्य ठिकाणी त्याची तक्रार केली तरच मानसिक तणावापासून स्वत:ची सुटका होईल असे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.बी.एम.भांजे यांनी आपल्या देशात अनेक प्रकारचे कायदे यासाठी कार्यरत असून न घाबरता विद्यार्थ्यांनी याबाबत तक्रार करावे असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.संध्या इंगळे यांनी केले तर आभार अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या समन्वयक प्रा.श्रीमती बी.एस.कोरे यांनी मानले. या कार्यक्रमात १०९ पेक्षा जास्त विद्यार्थी उपस्थित होते.

मंद्रुप

# अहवाल

आमच्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी महाविद्यालयाच्या परिसरात एकूण १३ सी.सी.टी.व्ही.कॅमेरे बसविले आहेत. सदर कॅमेरे चालू स्थितीत आहेत. व तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना ड्रेसकोड व ओळखपत्र बंधनकारक करण्यात आले आहे.

प्राचार्य,
संतोष भीमराव पाटील कला,वाणिज्य आणि
विज्ञान महाविद्यालय, मंद्रुप.